**ठळक बातम्या**

- सेशेल्सचा दौरा यशस्वीपणे पूर्ण करुन प्रधानमंत्री मायदेशी रवाना
- अयोध्येच्या श्री रामजन्मभूमी न्यास निधी अपहार प्रकरणी जनहित याचिकेची तातडीनं सुनावणी घ्यायला सर्वोच्च न्यायालयाचा पुन्हा नकार
- राज्यसभेच्या नवनिर्वाचित आठ सदस्यांचा शपथविधी
- महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापतीपदाची निवडणूक येत्या बुधवारी होणार

**आणि**

- नसरापूर इथल्या लैंगिक अत्याचार आणि हत्या प्रकरणात आरोपीला फाशीची शिक्षा/ ५८ दिवसात निकाल देणारा राज्यातला सर्वात वेगवान खटला

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सेशेल्सचा तीन दिवसांचा दौरा आटोपून मायदेशी परत यायला निघाले. त्यापूर्वी त्यांनी तिथल्या भारतीय समुदायाशी संवाद साधला. त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली तसंच त्यांच्यासोबत फोटो काढले. त्यानंतर त्यांनी व्हिक्टोरिया इथं नवशक्ती विनायगर मंदिराला भेट दिली आणि तिथे पूजा केली. तसंच पीस पार्क इथल्या महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीन दिवसांच्या दौऱ्यात सेशेल्सचे राष्ट्राध्यक्ष पॅट्रिक हर्मिनी यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा केली. काल सेशेल्सच्या राष्ट्रीय दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून सहभागी झाले.

**<><><><><>**

अयोध्येच्या श्री रामजन्मभूमी न्यासाच्या निधीचा अपहार झाल्याप्रकरणी दाद मागणाऱ्या जनहितयाचिकेच्या तातडीनं सुनावणी घ्यायला आज सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. न्यासाच्या कारभारात गैरप्रकार झाले असल्याचा आरोप करुन न्यायालयाच्या देखरेखीखाली या व्यवहाराचं फोरेन्सिक लेखा परीक्षण करण्याचे आदेश द्यावे अशी मागणी याचिकेत केली होती. मात्र न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी तातडीनं करण्याची

आवश्यकता नमूद करणारं पत्र सादर करायला सांगितलं. याचिका न्यायालयाच्या उन्हाळी सुट्टीनंतर पुन्हा सुनावणीला ठेवण्याचे आदेश न्यायमूर्ती एमएम सुंदरेश आणि न्यायमूर्ती शील नागू यांनी दिले.

दरम्यान, या प्रकरणातल्या आरोपींचं वकीलपत्र न घेण्याचा ठराव फैजाबाद वकील संघटनेनं केला आहे. याचं उल्लंघन करणाऱ्या वकीलाला ५ लाख रुपये दंड करण्याचा निर्णय वकील संघटनेच्या सर्वसाधारण सभेत आज घेण्यात आला.

<><><><><>

राज्यसभेवर नव्यानं निवडून आलेल्या आठ खासदारांनी आज राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे तसंच महाराष्ट्रातले राजेंद्र जैन यांचा त्यात समवेश आहे. राज्यसभा अध्यक्ष आणि उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी आपल्या दालनात त्यांना शपथ दिली. अनेक केंद्रीय मंत्री तसंच काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि प्रियांका गांधी वडरा याप्रसंगी उपस्थित होत्या.

<><><><><>

केंद्रीय निवडणूक आयोग उद्यापासून राजधानी दिल्लीत घरोघरी जाऊन मतदारांसाठी गणना अर्ज देण्याची मोहीम राबवणार आहे. मुख्य निवडणूक आयुक्त अशोक कुमार यांनी आज नवी दिल्लीत बातमीदारांना ही माहिती दिली. पात्र मतदारांचे अर्ज भरून घेण्याची ही मोहीम २९ जुलैपर्यंत चालणार आहे.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते संरक्षण दलातल्या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना शौर्य पुरस्कार प्रदान केले जातील. दिल्लीच्या राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात संरक्षण दलं, केंद्रीय सशस्त्र पोलीस दल आणि राज्य तसंच केंद्रशासित प्रदेशांच्या पोलिसांना आज सन्मानित केलं जाईल. हा कार्यक्रम संध्याकाळी पाच वाजता सुरु होईल.

<><><><><>

वजने आणि मापे संबंधित कायदा २००९ च्या अनुपालनात आस्थापनांनी पहिल्यांदाच कसूर केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याआधी त्यांना सुधारण्याची एक संधी देण्याचा निर्णय घेतल्याचं ग्राहक व्यवहार विभागाने म्हटलं आहे. पहिल्या चुकीनंतर आस्थापनेला सुधारणा सूचना देण्यात येईल आणि त्यानंतरही पालन न केल्यास कायदेशीर

कारवाई केली जाईल असं विभागाने कळवलं आहे. व्यवसाय सुलभता वाढवण्याच्या सरकारच्या धोरणांतर्गत जन विश्वास दुरुस्ती सुधारणा कायदा २०२६द्वारे ही सुधारणा केली गेली आहे. प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्यांना यामुळे दिलासा मिळेल परंतु अनुपालनात वारंवार ढिसाळपणा करणाऱ्यांना मात्र कारवाईला सामोरं जावंच लागेल असं विभागाने म्हटलं आहे.

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या उपसभापती पदाची निवडणूक १ जुलै रोजी घेण्याची घोषणा सभापती राम शिंदे यांनी केली. इच्छुक सदस्यांनी उद्या दुपारी १२ वाजेपर्यंत अर्ज दाखल करावेत. त्यांची छाननी उद्या १ वाजता होईल, असं त्यांनी जाहीर केलं.

वन्यप्राण्यांना पकडलेल्या किंवा त्यांचा वावर असलेल्या ठिकाणी किंवा बचाव मोहीम सुरू असताना सामान्य नागरिक आणि लोकप्रतिनिधींनी त्या ठिकाणी जाऊ नये, असं केल्यास त्यांच्यावर कारवाई करू, असा इशारा वनमंत्री गणेश नाईक यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासाला दिला.

सन २०२३-२४ या वर्षात आगीच्या एकंदर ५ हजार ११७ घटना घडल्या असून ११ हजार ५८० हेक्टरपेक्षा जास्त जळीत क्षेत्र आहे, अशी माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी दिली. वन विभागातल्या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असून दुर्गम भागात वायरलेस यंत्रणेद्वारे तात्काळ संपर्क साधून वेळेत आगीवर नियंत्रण मिळवण्याचं काम सुरू आहे, तसंच रिअल-टाईम मॉनिटरिंग यंत्रणेसाठी AI आधारित कॅमेऱ्याचा वापर पेंच व्याघ्र प्रकल्पासह इतर ठिकाणी केला जात आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

थोरामोठ्यांच्या कर्तृत्वाची माहिती देणारं नवं पुस्तक शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट केलं जाईल, अशी माहिती शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी महाराष्ट्राच्या विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. राज्यातल्या सर्व शिक्षण मंडळाच्या सर्व शाळांमध्ये मराठी शिकवली जाते की नाही हे पाहण्यासाठी विशेष मोहीम राबवली जाईल, असंही ते म्हणाले. ज्या अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रातल्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवली जात नसेल त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असं भुसे यांनी सांगितलं. गेल्या वर्षीच्या तुलनेत चालू शैक्षणिक वर्षात शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधली विद्यार्थी संख्या ७६ हजार ४८७

ने कमी झाल्याचं शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी सभागृहात सांगितलं. या शाळांमधली विद्यार्थी संख्या टिकवून ठेवण्यासाठी काही ठिकाणी सेमी इंग्रजी वर्ग सुरू केले आहेत. याशिवाय इतर अनेक उपाययोजना सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

राज्यात अवैध सावकारी प्रतिबंधक कायदा लागू झाल्यापासून साडे ११ हजार तक्रारी दाखल झाल्या. ८३० हेक्टर पेक्षा अधिक जमीन शेतकऱ्यांना परत दिली असून ५४९ गुन्हे दाखल केल्याची माहिती सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांनी विधानसभेत दिली.

त्याआधी TET पेपरफुटी प्रकरणी सभागृहात स्थगन प्रस्ताव मांडू देण्याचा विरोधकांचा प्रस्ताव विधानसभा अध्यक्षांनी फेटाळून लावला. याबाबत सरकारतर्फे सभागृहात आजच सविस्तर निवेदन केलं जाईल, असं शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

महाराष्ट्रात पुणे जिल्ह्यातल्या नसरापूर इथं साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून तिची हत्या केल्या प्रकरणातला आरोपी भीमराव कांबळे याला न्यायालयाने फाशीची शिक्षा दिली आहे. पुणे जिल्हा आणि सत्र न्यायालयाचे विशेष न्यायाधीश न्यायमूर्ती एस. आर. साळुंखे यांनी आज हा निर्णय दिला. आरोपीने केलेला गुन्हा अत्यंत क्रूर, अमानुष आणि 'दुर्मीळातील दुर्मीळ' स्वरूपाचा असल्याचं न्यायालयानं नमूद केलं. आरोपीविरोधात सादर करण्यात आलेले परिस्थितीजन्य आणि वैज्ञानिक पुरावे भक्कम असल्याचं निरीक्षण नोंदवत, केवळ वय हा शिक्षेत सवलत देण्याचा आधार ठरू शकत नाही असं न्यायाधीश साळुंखे यांनी स्पष्ट केलं.

या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यापासून ५८ दिवसांत निर्णय देण्यात आल्यामुळे हा राज्यातला सर्वात वेगवान खटला ठरला आहे. या प्रकरणाच्या निकालावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाधान व्यक्त केलं आहे.

१ मे रोजी नसरापूर इथं साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून आरोपीने तिची हत्या केली होती. त्यानंतर राज्यभरात जनक्षोभ उसळला होता.

<><><><><>

जम्मू काश्मीरमध्ये दरवर्षी होणारी अमरनाथ यात्रा यंदा ३ जुलैपासून सुरु होत आहे. यात्रा सुरळीत व्हावी यादृष्टीनं सर्व तयारी पूर्ण झाली आहे.

<><><><><>

व्हेनेझुएलाला बुधवारी बसलेल्या भूकंपाच्या दोन धक्क्यांमुळे मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या एक हजार चारशे पन्नासवर पोहोचली आहे. नॅशनल असेम्ब्लीचे अध्यक्ष जॉर्ज रॉड्रिग्ज यांनी सभागृहात ही माहिती दिली.

<><><><><>

टी ट्वेंटी क्रिकेटमधे काल भारतावर आयर्लंडने अवघ्या एका धावेनं विजय मिळवला. दोन सामन्याच्या मालिकेतला शेवटचा सामना काल बेलफास्ट इथं झाला. आयर्लंडने विजयासाठी भारताला १५५ धावांचं आव्हान दिलं होतं. मात्र भारताला २० षटकात केवळ १५३ धावा करता आल्या. जय मुंद्रा सामन्यातला आणि मालिकेतलाही सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरला.

<><><><><>

आसाममधे धेमाजी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पूर येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मुसळधार पावसात दरडी कोसळल्यानंअरुणाचल प्रदेशातल्या गई नदीच्या उपनदीचा प्रवाह अडून ते पाणी आसामात पसरण्याची शक्यता आहे. प्रशासनानं या दृष्टीनं तयारी केली आहे. सखल भागातल्या रहिवाशांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. दरम्यान जोनायमधे पुराचं पाणी राष्ट्रीय महामार्गावर आल्यानं वाहतूक बंद पडली आहे. पुराचं पाणी शेतात आणि घरातही शिरलं आहे.

<><><><><>

भारतीय हवामानशास्त्र विभागानं आज पश्चिम बंगालचं हिमालयीन क्षेत्र आणि सिक्कीममध्ये जोरदार ते अति जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. तसंच, पुढच्या दोन ते तीन दिवसांत गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड, झारखंड, बिहार, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडच्या काही भागांत नैऋत्य मोसमी पावसाची आगेकूच होण्यासाठी अनुकूल स्थिती असल्याचंही हवामान विभागानं म्हटलं आहे.

//<><><><><>//